No. ४८७४

Office of the
Addl, Director General of Police,
अपर पोलीस महासंचालक,
C.I.D. Maharashtra State,
गुन्हे अन्वेषक विभाग, महाराष्ट्र राज्य,
Sangam Bridge, Shivaji Nagar,
संगमब्रीज, शिवाजीनगर, यांचे कार्यालय,
Pune - 411 005. पुणे- ४११ ००५.

Date : [redacted]6 AUG 2010

**परिपत्रक :**

संदर्भ - १) शासन निर्णय क्र.एमआयएस ०५०८/७४८/प्र.क्र.३२९/पोल -४ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ , दि.२२/५/२००९.

२) पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे परिपत्रक क्रं. पोमसं/१७/६१६२/सीसीटीएनएस/२००९ मुंबई दि.३/१२/२००९.

३) अपर पोलीस महासंचालक, कार्यालय जा.क्र.रा.गु.अ.के./संगणक/CCTNS/ ९८५/२०१० पुणे दि.०१.०२.२०१०.

विषय - CCTNS प्रकल्पांतर्गत नियुक्त केलेल्या District Mission Team च्या कार्यकक्षेबाबत.

********

उपरोक्त विषय व संदर्भान्वये, CCTNS या महत्वकांक्षी प्रकल्पाच्या परिणामकारक व प्रभावी अंमलबजावणीसाठी निरनिराळया समित्या/टीम गठीत करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक जिल्हा घटकांमध्ये सदर प्रकल्पाची अंमलबजावणी,नियंत्रण व पर्यवेक्षण करण्यासाठी **District Mission Team** गठीत करण्यात आलेली आहे.

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८.०६.२०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या स्टेट ॲपेक्स कमिटीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देषानुसार जिल्हा घटकात **District Mission Team** ची बैठक प्रत्येक महिन्यात आयोजित करण्यात यावी व त्या बैठकीचे इतिवृत्तांत पोलीस महासंचालक कार्यालय व अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि.म.रा.पुणे येथे पाठविण्यात यावे. सदर माहे बैठकीमध्ये **District Mission Team** ने खालील नमुद मुद्यांनुसार कार्यवाही करुन प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करावी.

१) जिल्हा प्रकल्प प्रस्ताव तयार करणे.

२) निवडलेल्या प्रत्येक पोलीस ठाण्यांमध्ये प्रकल्पाची व्यवस्थित अंमलबजावणी झाल्याची खात्री करणे.

D:\WinZip\VN\District Mission Team.doc

Create PDF files without this message by purchasing novaPDF printer (http://www.novapdf.com)

३) प्रकल्पाच्या हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरची उभारणी आणि कार्यान्वयन याबाबतची खात्री करणे.

४) जिल्हयातील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचा-यांना प्रशिक्षण देवून त्यांचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेणे.

५) सर्व **Utilities** साठी जागेची उपलब्धता निर्माण करणे.

६) प्रकल्पासाठी स्वतंत्र खाते **CCTNS Project (Account)** ठेवणे.

७) NCRB, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे CCTNS प्रकल्पाच्या यशस्वी अमंलबजावणीकरीता प्रत्येक जिल्हा घटकात ५-७ कार्यक्षम अधिकारी /कर्मचा-यांचा एक Core Group तयार करण्यात यावा.

८) CCIS/CIPA या प्रकल्पाअंतर्गत सर्व गुन्हयांची प्रलंबित माहिती (IIF I to VII) तत्परतेने संगणकामध्ये संकलित करावी. जेणेकरुन सर्व माहिती CCTNS प्रकल्पामध्ये परावर्तीत करणे सुलभ होईल.

तरी सर्व घटक प्रमुखांनी **CCTNS** प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी उपरोक्त मुद्यांनुसार पुर्व तयारी करावी. पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी दि. २०/३/१० च्या परिपत्रकामध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे DCTC साठी लागणा-या साधन सामुग्रीची खरेदी प्रक्रीया पूर्ण करुन त्याबाबतच्या निविदा, बिले इ. लवकरात लवकर पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावीत, जेणेकरुन रु.१ लाख ४५ हजार इतका निधी प्राप्त होईल. तसेच **Capacity Building Infrastructure** चे अनुषंगाने **District Computer Training Centre (DCTC)** सुरू करून त्यामध्ये सर्व अधिकारी / कर्मचा-यांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करावे ही विनंती.

8/10/10

**(एस.पी.एस.यादव )**
अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व
Chairman , State Mission Team
CCTNS Project.

**प्रति,**

३. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
४. सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी -**
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.

**प्रत माहितीस्तव सादर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

D:\WinZip\VN\District Mission Team.doc

Create PDF files without this message by purchasing novaPDF printer (http://www.novapdf.com)